परीशीष्ट -५

७/५/२००९ने उच्च न्यायालयाच्या याचिकेच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत कळवून देखील दिनांक ३०/५/२००९ रोजी पुन्हा ६ महिने मुदतवाढीसाठी प्रस्ताव ठेवणेत आला होता.सदरचा प्रस्ताव दिनांक १०/६/२००९रोजी नाकारण्यात आला आहे ही बाब नियमबाहय असलेचे दिसून येते.

मुददा क्रं. ६:- <u>श्री महालक्ष्मी मंदीरातील जुन्या फरशीसंबंधी</u> :-

श्री महालक्ष्मी मंदीरातील जुन्या फरशी बाबत संबंधीत उपअभियंता व कंत्राटदार यांनी कशा प्रकारे विल्हेवाट लावली याबाबतच्या संचिका तपासणीस प्राप्त झाल्या त्यानुसार मंदीरातील ग्रेनाईट फरशी बसविणेसाठी संबंधित कंत्राटदार यांनी काम सुरु करण्यापूर्वी करारनामा करणे आवश्यक होते तो केलेला नाही तसेच कत्राटदार यांना security deposit न भरता फरशी बसविणेचे काम देवून रु दहा लाख ॲडव्हान्स म्हणून समितीने दिलेचे दिसून येते ही बाब बेकायदेशिर असलेचे स्पष्ट होते. तसेच जुन्या फरशीची विल्हेवाट लावणेबाबत कोणत्याही प्रकारच्या निविदा मागविणेत आलेल्या नाहीत. बेकायदेशिरपणे जुन्या फरशीची विल्हेवाट लावली असलेचे दिसून येते.

मुद्या क्रं.७व ८ :- <u>महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ बाबत तक्रार:-</u>

वाडी रत्नागिरी ता.पन्हाळा येथे श्री केदारलिंग देवस्थानच्या मालकीच्या गट नं ४ मधील ०.६० आर जमीन भक्त निवास बांधणेसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई यांनी मागणी केले प्रमाणे जिल्हाधिकारी कोल्हापूर तथा अध्यक्ष,जोतीबा परिसर विकास समिती,कोल्हापूर यांनी सदर यात्री निवास बांधणेसाठी व जोतीबा येथील ०.६० आर भक्त निवास बांधणेसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांना वार्षिक नाममात्र रु १/- भाडयाने भाडेपटयाने देणेस हरकत नसलेबाबत चर्चा झाली.त्यामध्ये धर्मादाय सहा आयुक्त, कोल्हापूर यांचे मंजुरीचे अधिनस्त भाडेपटयाने मंजूरी देणेत आली आहे.सदरची जमीन ही श्री केदारलिंग देवाची असून ही देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे ताबेत असली तरी सुध्दा ही जमीन महसूल खात्यामार्फत सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,मुंबई यांचे नांवे भाडे पटयाने देणे वाजवी होते.शासनाचे नियमानुसार आवश्यक ती मंजुरी घेतलेली नाही.

मुद्या क्रं ९ <u>:- श्री महालक्ष्मी मंदीर परिसरातील २७ दुकान गाळ्याबाबत :-</u>

महालक्ष्मी मंदीर परिसरातील २७ गाळ्या बाबतच्या फाईली पाहील्या.त्यामध्ये मूळ गाळा धारक कोण आहे,प्रथमत: हा गाळा कोणास दिला?याबाबत कागदोपत्री पुरावा अगर मूळ आदेश फाईलीस उपलब्ध नाही.मयत झाले इसमाच्या वारसाच्या फक्त अर्जावरुन नांव लावणेस मंजुरी दिलेची दिसून येते व भाडैवाढ चार वर्षातून १०% इतकी केली आहे.सरसकट गाळाधारकांचे भाडे पहाता नाममात्र असलेचे दिसून येते.त्यानंतर भाडेवाढ करुन उत्पन्न वाढवणेचा प्रयत्न केलेला नाही.

"ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे."

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\devasthan\chavan\chavan.doc

जन माहिती अधिकारी
कार्यासन/शाखा- , विधी व न्याय विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.